## रे. मु. नं. ४६/२०१३ मधील निशाणी २८ खालील आदेश

१) वादीने प्रतिवादींविरूध्द निशाणी २८ अन्वये दाव्यामध्ये दुरूस्तीसाठी अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केलेले नाही.

२) याठिकाणी वादीच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले. खालील वाद प्रश्नांचे उत्तर कारणांसह देत आहे ते खालीलप्रमाणे.

| | वाद प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १. | वादीने दाव्यामध्ये दुरूस्तीसाठी योग्य व संयुक्तिक कारण दिले आहे का ? | ... **होय.** |
| २. | नियोजित दुरूस्ती ही दाव्याचा अंतिम निकाल करण्याकरिता मदत करणारी आहे का ? | ... **होय.** |
| ३. | काय आदेश ? | ... **अंतिम आदेशानुसार** |

## कारणमिमांसा

### वाद प्रश्न क. १ व २ चे उत्तर

३) यात वादीतर्फे अर्जात कथन केलेले आहे की, वादीने सदरचा दावा प्रतिवादींच्याविरूध्द वाटप व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. दावा चालु असताना गट नं. २३८, २३९, २५२ मधील मिळकती प्रतिवादी नं. ४ व ५ यांनी नागनाथ सिताराम भोसले यांना दावा नं. १५४४/२०१३ मध्ये तडजोड करून हिस्सा परस्पर तडजोडीने हस्तांतरीत केलेला आहे. त्यामुळे त्या दाव्यातील हुकूमनामा वादीवर बंधनकारक नाही. म्हणुन प्रतिवादी नं. ८ ते १६ यांना पक्षकार करून दुरूस्ती करून मागितलेली आहे. तसेच दावा कलम १ब, ६अ, ८अ यामध्ये वादी आपला मजकुर दुरूस्तीअन्वये दाखल करण्याची मागणी केलेली आहे. वादीचे कथन की, सदर दुरूस्ती ही दावा चालु असताना झालेल्या

बदलामुळे करणे आवश्यक आहे. तरी ती दुरूस्ती मंजुर करण्यात यावी.

४) सदर दुरूस्ती ही दाव्याच्या दरम्यान घडलेली आहे. दाव्यातील मिळकत ही नियोजित प्रतिवादी यांच्या हक्कामध्ये दाव्यातील मिळकतीसंबंधी हितसंबंध निर्माण केले गेलेले आहेत. याठिकाणी दाव्यातील मिळकतीसंबंधी अंतिमरित्या वाद निवारण होण्यासाठी त्यांना पक्षकार करणे आवश्यक आहे. त्यामुळे वादीने अर्जामध्ये दुरूस्तीसाठी योग्य व संयुक्तिक कारण दिलेले आहे. नियोजित दुरूस्ती ही दाव्याचा अंतिम निर्णय करण्याकरिता मदत करणारी आहे. त्यामुळे या व वरील सर्व कारणास्तव वाद प्रश्न क्रमांक १ व २ चे उत्तर 'होय' असे देत आहे.

**<u>वाद प्रश्न क. ३ चे उत्तर</u>**

५) या वाद प्रश्नाच्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. वादीचा निशाणी २८ वरील दावा दुरूस्ती अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यास आदेश देण्यात येते की, दावा दुरूस्ती व दावा दुरूस्ती प्रत, आदेश झाल्यापासुन ७ दिवसांच्या आंत दाखल करण्याचे आहे. तसे न केल्यास अर्ज आपोआप रदद समजण्यात येईल.

३. खर्चाबाबत वेगळा आदेश नाही.

**( एस. एस. इंदलकर )**
दिनांक : १७.०२.२०१६. दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
माळशिरस.

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this PDF file Order is same word to word as per the original Order.

(a) Name of the Stenographer : **S. M. Malkapalli**

(b) Court : **Civil Court Senior Division, Malshiras.**

(c) Order signed by P.O. on : **17.02.2016.**

(d) Order uploaded on : **17.02.2016.**